महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २५७ वा • पाने ४ | बुलडाणा, शनिवार, दि.२७ एप्रिल २०२४ | • RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये



**अक्षराज : आकाश जयस्वाल**
**दि.२५, माहूर (नांदेड) :**
महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.
**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

# सोलापुरात सोमवारी एकाच दिवशी नरेंद्र मोदींसह उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या सभा

**दि.२६, सोलापूर :** सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या प्रचारासाठी येत्या २९ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन जाहीर सभा होणार असताना त्याच दिवशी सोलापुरात महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांची संयुक्त जाहीर सभा होणार आहे.

सोलापूर आणि माढ्याच्या लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना आता बड्या नेत्यांच्याही सभा होत असल्यामुळे रणधुमाळी चांगलीच वाढली आहे. गेल्या २४ एप्रिल रोजी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची जाहीर सभा सोलापुरात लक्ष्मी मिलच्या मैदानावर झाली होती. या सभेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर आता महातुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांची जाहीर सभा २९ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता होम मैदानावर आयोजिली आहे. या विस्तीर्ण मैदानावर सुमारे दोन लाखांचा जनसमुदाय उपस्थित राहील, असा विश्वास भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी व्यक्त केला आहे. या सभेची जय्यत तयारी होत असताना दुसरीकडे म हाविकास आघाडीच्या प्रणिती शिंदे यांच्या प्रचारासाठी कर्णिक नगरातील मैदानावर शिवसेना उद्धव ठाकरे प्रक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची संयुक्त जाहीर सभा आयोजित केली आहे. सायंकाळी ४.३० वाजता होणाऱ्या या संयुक्त सभेची तयारी होत असल्याचे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हा समन्यक, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे व जिल्हाप्रमुख




पुरूषोत्तम बरडे यांनी सांगितले.

सोलापूर लोकसभा मतदरसंघात महाविकास आघाडीसाठी शरद पवार यांच्या पाच जाहीर सभा होणार आहेत. पहिली सभा मोहोळमध्ये झाली. त्यावेळी भाजपचे स्थानिक नेते संजय क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला होता. दुसरीकडे माढा मतदारसंघात मोडनिंब (ता. माढा), करमाळा, सांगोला आदी तालुक्यात पवार यांच्या सभा झाल्या आहेत. करमाळ्यात त्यांच्या उपस्थितीत तेथील शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार नारायण पाटील यांनी राष्ट्रवादीची ' तुतारी' हातात घेतली.

दरम्यान, महायुतीकडून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्य योगीनाथ यांच्याही सभेसाठी प्रयत्न होत आहेत. तर काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनाही सभेसाठी आमंत्रित करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीने चालविला आहे.

# थोडक्यात

## ठाण्यात उपवनची हवा सर्वाधिक शुद्ध !



**अक्षराज : विकास दळवी**
**दि.२६ ठाणे :** ठाणे कडक उन्हाळा अनुभवत असताना दुसरीकडे हवेची गुणवत्ता मात्र सुधारली असल्याचे समाधानकारक चित्र ठाण्यात दिसू लागले आहे. मात्र ठाण्यात उपवन येथील हवेचा सरासरी गुणवत्ता निर्देशांक २४ एप्रिलला ७४ इतका आढळल्याने ठाण्यातील इतर ठिकाणांच्या तुलनेने उपवन या ठिकाणची हवा सर्वाधिक शुद्ध असल्याचे समोर आले.मागील काही दिवसात अशुद्ध हवेला ठाणेकरांना सामोरे जावे लागले आहे.हवेचा गुणवत्ता निर्देशांक सरासरीपेक्षा कमी आढळला आहे.त्यामुळे हवेची गुणवत्ता सुधारत असल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.सध्या हवेचा निर्देशांक सरासरी ८४ एवढा आढळला आहे. शहरातील विविध विकास कामे व वाहतूक कोंडीमुळे प्रदुषणात वाढच होताना दिसत होती.प्रदुषण रोखण्यासाठी महापालिकेने पासून ७ नोव्हेंबर २०२३ पासून मार्गदर्शक तत्वे जारी केली आणि त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केल्याचेही दिसून आले.विकासकामांच्या ठिकाणी प्रदुषण रोखण्यासाठी केलेल्या उपाय योजना,रस्त्यांची धुलाई, आदींसह इतर उपाययोजना करण्यात आल्याने ठाण्यातील हवेची गुणवत्ता निर्देशांक सुधारल्याचे दिसत आहे.ठाणे म हापालिका हद्दीत घोडबंदर, तीन हात नाका आणि उपवन येथील हवा मध्यम प्रदुषित गटात मोडत होती.परंतु एप्रिल महिन्यात शहराची हवेची गुणवत्ता शुद्ध गटात अर्थात हिरव्या रंगात आली आहे.त्यामुळे ठाण्याची हवा सध्या ठाणेकरांसाठी चांगली असल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.

## वाकडी येथे धाराशिव लोकसभा मतदार संघाची महाविकास आघाडीची प्रचार सभा

**अक्षराज : संगिता वनकळस**
**दि.२६, कळंब (धाराशिव) :** वाकडी ता.परंडा येथे धाराशिव लोकसभा मतदार संघाची महाविकास आघाडीची प्रचार सभा पार पडली. यावेळी धाराशिव जिल्हाचे कायम खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर , माजी आमदार ज्ञानेश्वर तात्या पाटील, माजी आमदार राहुल भैय्या मोटे, जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस प्रतापसिंह पाटील, तालुकाप्रम ुख मेघराज पाटील, तालुकाप्रमुख संदिप पाटील, शंकर इतापे, धनंजय हांडे, नानासाहेब कदम, प्रविण नवले, महेश ठोंगे, अजित पाटील, बाळासाहेब पाटील, सुजित देवकते संचालक, संजय पवार उपसभापती, संचालक सुजित देवकते, विलास शाळू प्रहार जिल्हा अध्यक्ष, वरशद नाना शिंदे, धनंजय हांडे, दिपक पाटील, दत्ता माळी, बंडु रगडे, बाळासाहेब पाटील, भारत नाना पवार, दत्तात्रय रगडे, काशीनाथ वाळेकर, शंकर इतापे सुखदेव डोके, प्रकाश पाटील, भारत बनसोडे, हनुमंत वरेळकर नामदेव रगडे, आश्राम पाटील, आरुण पाटील, सर्जेराव ठवरे, विष्णु लोंढे, तात्यासाहेब रगडे, हनुमंत हांडे, प्रशांत गायकवाड, ज्ञानेश्वर झील बालाजी नाईकनवरे, निखील कारडे, बालाजी सुरवसे, युवराज सोनवणे, ज्ञानेश्वर कावकडे, महेश पाटील, हनुमंत गायकवाड, चंद्रगुण जाधव, विकास यादव, विकास जाधव, धनंजय आंधळे, बुध्दीवान लटके उपस्थित होते.

# पारनेर तालुक्यातच निलेश लंके विरोधात जनतेचा मोठा रोष

**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.२६, सुपा (अ.नगर) :** महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी आमदार असताना तालुक्याच्या कुठल्याही प्रश्नांची सोडवणूक केली नाही. केवळ दहशतीला खतपाणी घालण्याचे काम त्यांनी आपल्या बगल बच्च्यांमार्फत केले. यामुळे पारनेर मतदार संघातील जनता त्यांना कोणताही थारा देणार नाही असा दावा पारनेरचे भाजपा तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांनी केला.

शिंदे म्हणाले, त्यात त्यांनी केवळ उमेदवारीसाठी अजित पवारांशी केलेल्या गद्दारीमुळे निष्ठावंत कार्यकर्ते नाराज आहेत असेही शिंदे म्हणाले. लंके आपल्या आमदारकीच्या काळात केवळ आश्वासने दिली. प्रशासनाला वेठीस धरून केवळ आपल्या आसपासच्या लोकांचा त्यांनी उद्धार केला. कोणतीही ठोस कामे त्यांनी केली नसल्याने मतदारांचा कौल महायुतीच्या उम ेदवाराकडे असल्याचे राहूल शिंदे यांनी सांगितले.

पारनेरचे आमदार निलेश लंके हे कोविड काळात केलेल्या नौटंकीचा पर्दाफाश आता झाला आहे. सरकारचे अनुदान घेऊन कोवीड सेंटरच्या माध्यम ातून श्रेय लाटण्याचे काम त्यांनी केले. एकीकडे जनता कोविड संकटाने त्रस्त झाली असताना लंके मात्र या संकटातून स्वताला प्रसिद्धी मिळविण्यात दंग होते. ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. ही बाब म तदार संघातील जनतेला रुचलेली नाही. त्या कोवीड रुणालयाचे सत्य माध्यमांनी समोर आल्याने लोकांच्या मनात लंके



यांच्या विरोधात प्रचंड चिड निर्माण झाली आहे.

आधीच लोकांनी त्यांना लोकसभेच्या निवडणुकीत उतरू नये असे सांगत असताना लंके यांनी केवळ लोकसभेच्या उमेदवारीसाठी अजितदादांची साथ सोडली सहा म हिन्यात त्यांनी अजित पवारांशी गद्दारी केली. यामुळे मतदार संघातील लोकांचा विश्वास कसा संपादन करतील? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तर दुसरीकडे महायुतीचे उमेदवार यांनी कोविड काळात आपल्या रुग्णालयात लोकांची मोफत सेवा केली. त्याचबरोबर जिल्हाभर आरोग्य शिबीरे राबवुन लोकांना सहकार्य केले. तसेच जिल्ह्यात ऑक्सिजन आणि रेमडिसीवीरचा तुटवडा असताना त्यांनी जिल्ह्यात शर्तीचे प्रयत्न करत हा पुरवठा कायम ठेवला. पण याची कुठेही प्रसिद्धी केली नाही. कोणता पुरस्कार मिळावा यासाठी आटापिटा केला नाही. या सर्व सेवाभावी कार्याची सहानभूती डॉ. सुजय विखे पाटील यांना निश्चित मिळेल असा विश्वास यांनी व्यक्त केला.

# माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांना भारतरत्न देण्यात यावा- खा.उदयनराजे भोसले

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**
**दि.२६, सातारा :** देशाचे उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री सातारा जिल्ह्याचे सुपुत्र स्व.यशवंतराव चव्हाण यांचे देशासाठी दिलेले योगदान बघता त्यांना भारतरत्न देण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे करणार.२९ एप्रिल रोजी कराड येथे होणाऱ्या विराट जाहीर सभेत करणार आग्रह.

महाराष्ट्राच्या मातीत अनेक चळवळी उदयास आल्या, त्यामध्ये स्त्री शिक्षण, सत्यशोधक समाज, प्रतिसरकार यांचे मोठे योगदान देशाच्या उभारणीच झाले. कैलासवासी यशवंतराव चव्हाण यांनी देखील देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. परकीय



आक्रमणाच्या काळात त्यांनी देशाचे संरक्षण मंत्रीपद भूषवले. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून आला असे त्यामुळेच म्हटले जाते. यशवंत विचार हा लोककल्याणाचा विचार आहे. काँग्रेस पक्षाने त्यांच्या नावाचा केवळ निवडणुकीपुरता वापर केला पण त्यांचे विचार आचरणात आणले नाहीत एवढे मोठे व्यक्तिमत्व महाराष्ट्रात होऊन गेले तरी देखील काँग्रेसला भारतरत्न पुरस्कार देण्याची सुचले नाही.

काँग्रेसला आऊट ऑफ साईट आऊट ऑफ माईंड हे सूत्र लागू होतं. यशवंतरावांना भारतरत्न पुरस्कार देण्याचे कर्तव्य आम्ही पार पडणार आहोत. काही लोकांनी स्वार्थापुरता यशवंतराव चव्हाण यांच्या नावाचा वापर केला, त्यांनाही यशवंतरावंना भारतरत्न द्यावा असे वाटले नाही.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची २९ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या कर्मभूमीत कराडमध्ये जाहीर सभा होणार आहे या सभेतच यशवंतरावांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी आम्ही करणार आहे.

# मतदानयंत्र बिघडल्यामुळे अनेक ठिकाणी मतदान खोळंबले

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, बुलडाणा :** बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी सुरू असलेल्या मतदानादरम्यान मतदानयंत्र व व्हीव्हीपॅट नादुरुस्तीमुळे अनेक ठिकाणी मतदान खोळंबले होते. बुलढाणा शहरातील एका केंद्रावर अर्धा तास खोळंबा झाल्याने यंत्रणांची धावपळ झाली. यामुळे हजारो मतदारांची गैरसोय झाल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. दुपारी तीन वाजेपर्यंत मतदारसंघातील विविध केंद्रांवर २६ बॅलेट युनिट, १३ कंट्रोल युनिट, तर २५ व्हीव्हीपॅट नादुरुस्त झाल्यामुळे मतदानात खोळंबा निर्माण झाला होता. मात्र यंत्रणांनी पर्यायी संयंत्र लावल्यावर मतदान सुरुळीत झाले.


दुसरीकडे प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी केंद्राध्यक्ष मतदान मॉक ड्रिल घेतात. या तालीम दरम्यान २४ बॅलेट , १२ कंट्रोल युनिट तर २२ व्हीव्हीपॅट बिघडल्याने कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली होती. ही यंत्रे बदलून घेतल्यावर प्रत्यक्ष



मतदानाला सुरुवात करण्यात आली.

बुलढाणा येथील बसस्थानक समोरील प्रशासकीय इमारत मतदान केंद्र क्रमांक १९९ येथील मतदान यंत्रात बिघाड झाला होता. परिणामी, मतदान खोळंबले. यामुळे मतदारांनी संताप व्यक्त केला. मोताळा तालुक्यातील कोराला बाजार केंद्रावरदेखील असाच प्रकार घडला होता.

# संपादकीय



## बदलत्या हवामानाचा फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही जाऊ शकतो. मागील वर्षी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. मागील वर्षी उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकराना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे.

कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ अशा घटना वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. कॉंक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत.

निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# मॉर्स सॅम्युअल: तारायंत्राचे जनक

**अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली.**

तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन- मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स ॲकॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा- दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भूत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला.

तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे- पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले. त्यानंतर विद्युत विषयक प्रयोगांत त्यांनी सातत्याने विशेष रस घेतला.

सन १८३२मध्ये फ्रान्सहून जहाजातून परत येतानाच्या प्रवासात चार्लस टी.जॅक्सन यांनी मॉर्स यांना लांब अंतरावर विद्युत प्रेषण करणारे व फ्रान्समध्ये मिळवलेले एक उपकरण दाखविले. यामुळे मॉर्स यांना विद्युत व तारायंत्र या विषयांत अधिक स्वारस्य निर्माण झाले. पुढील तीन वर्षे त्यांनी अनेक प्रयोग करून सन १८३५मध्ये पहिले विद्युत चुंबकीय तारायंत्र उपकरण केले. यात एक विद्युत मंडल चालू व बंद करून संकेत प्रेषण करणारा प्रेषक, संकेतांची नोंद करणारा विद्युत चुंबकीय ग्राही आणि संकेतांचे अक्षरे व संख्या यात रूपांतर करणारी सांकेतिक लिपी यांचा समावेश होता.

त्यांनी योजलेली ठिपके- डॉट्स व प्रास- डॅशेस यांवर आधारलेली सांकेतिक लिपी अद्यापही त्यांच्या नावाने ओळखली जाते. ज्यात कट्ट व कड या दोन ध्वनींच्या साहाय्याने ठिपका व प्रास दर्शविले जातात. पुढे त्यांनी अधिक लांब अंतरावर संदेश पाठविण्यासाठी विद्युत चुंबकीय अभिचलित्रांच्या प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या शोधाच्या विकासात त्यांना एल.डी.गेल व जोझेफ हेन्री यांचे तांत्रिक साहाय्य आणि ॲल्फ्रेड व्हेल यांचे आर्थिक साहाय्य लाभले.

मॉर्स यांनी सन १८३७मध्ये आपल्या शोधाच्या एकस्वाकरिता अर्ज केला, परंतु त्यांना आपल्या शोधाला मान्यता मिळवण्यास जवळजवळ सात वर्षे वाट पहावी लागली. शेवटी सन १८४३मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने वॉशिंग्टन ते बाल्टिमोर यांच्या दरम्यान तारयंत्राद्वारे प्रायोगिक संदेशवहन प्रस्थापित करण्यासाठी तीस हजार डॉलरचे अनुदान मंजूर केले. दि.२४ मे १८४४ रोजी या योजनेद्वारे पहिला संदेश प्रेषित करण्यात आला.

मॉर्स यांच्यात नेतृत्वाचेही गुण होते. रंगभूमीवरील स्वैराचार विरुद्ध मोहीम उघडण्याचा एक भाग म्हणून त्यांनी सन १८२७मध्ये न्यूयॉर्क येथे जर्नल ऑफ कॉमर्स हे रंगभूमीसंबंधीच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार देणारे नियकालिक स्थापन करण्यास मदत केली. चित्रकारांना मदत करण्यासाठी व अमेरिकन जनतेची कलाविषयक अभिरुची उंचावण्यासाठी नॅशनल ॲकॅडेमी ऑफ डिझाइन या सन १८२६मध्ये स्थापन झालेल्या संस्थेचे ते एक संस्थापक व पहिले अध्यक्षही होते. सन १८३२-३६ या काळात त्यांनी नेटिव्ह अमेरिकन चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. तिच्यातर्फे न्यूयॉर्क शहराच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणूनही ते उभे राहिले होते. परंतु राजकारणातील त्यांचा सहभाग अयशस्वी ठरला. सन १९२२मध्ये ते युरोपला गेले आणि तेथे अभ्यास, प्रवास व चित्ररेखाटन यांत तीन वर्षे त्यांनी खर्च केली. सन १८३२मध्ये अमेरिकेला परतल्यावर न्यूयॉर्क विद्यापीठात चित्रकला व शिल्पकला या विषयांच्या प्राध्यापकपदावर त्यांची नेमणूक झाली. पुढे तेथेच ते संकल्प चित्रकलेच्या वाययाचे प्राध्यापक झाले होते.

मॉर्स यांचे देहावसान वयाच्या ९९व्या वर्षी न्यूयॉर्क येथे दि.२ एप्रिल १८७२ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर तारायंत्राचे जनक ही त्यांची कीर्ती दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या शोधामुळे पुसट होत गेली, तथापि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती मात्र वाढली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे जगातील अनेक संग्रहालयांत प्रदर्शित केली गेलेली आहेत. त्यांचे तारायंत्र उपकरण वॉशिंग्टन येथील नॅशनल म्युझियम ऑफ हिस्टरी अँड टेक्नॉलॉजी या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आले आहे.

**!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या लोकोपयोगी संशोधनास विनम्र अभिवादन !!**

**- संकलन व सुलेखन -**
**श्री. कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली**
**फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.**

# कांदाप्रश्नी आंदोलन केले म्हणून मी गुंड का ? - निलेश लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहमदनगर :** मागिल काही दिवसांपूर्वी विखे पिता- पुत्रांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटले. कांदा निर्यातबंदी उठवण्यासाठी भेट घेतल्याचा गवगवा त्यांनी केला. पारनेर, टाकळीढोकेश्वर येथे फटाके वाजविण्यात आले.



नगरच्या बाजार समितीमध्ये सत्कार स्वीकारत निर्यातबंदी उठविली गेली नसती तर मी मते मागण्यासाठी गेलो नसतो, अशी बतावणी केली. निळवंडे,साकळाई,ताजनापूर या योजना झाल्या नाही, तर निवडणूकीचा अर्ज भरणार नाही, अशी प्रतिज्ञा करणारे खासदार यांचे काम खोटे बोल पण रेटून बोल असे आहे. विखे कुटुंबाने गेल्या ५० वर्षात जिल्ह्यात काय दिवे लावले?, एखाद्या मोठा प्रकल्प आणला का?, तरुणांना रोजगार मिळाला का? त्यांच्या घराकडे जाणारा नगर - मनमाड रस्ता त्यांना करता आला नाही, ते खासदार विकासाच्या काय गप्पा मारतात? मी कांद्याच्या भावासंदर्भात आंदोलन केले म्हणून माझ्यावर गुन्हा दाखल झाला. त्यामुळे मी गुंड का,असा सवाल लंके यांनी प्रचार सभेत केला.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसद बंद पाडणार**

ज्यांना शेतकऱ्यांचे नेतृत्व करण्यासाठी दिल्लीत पाठवलं त्यांनी शेतकऱ्यांसाठी आवाज उठवला नाही. खोटे बोल पण रेटून बोल ही विखे कुटुंबाची सवय आहे. अमित शहांना भेटून आले आणि निर्यातबंदी उठवल्याचे सांगून सत्कार करून घेतले आणि नंतर कळले बातमी खोटी आहे, असा टोला लंके यांनी सुजय विखे यांना लगावला.

मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. मला एकदा संधी द्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नाही संसद बंद पाडली नाही तर नाव बदलेल, माझ्यावर विश्वास ठेवा. अभिमान वाटेल असे काम करून दाखवील. असे सांगत मी जे बोलतो तेच करतो; व जे करतो तेच बोलतो. दुसऱ्याच्या खांद्यावर पंढरपूर करणारा मी नाही,असा टोला निलेश लंके यांनी लगावला.

## कसा आरसा..

सगळीकडे घरामध्ये
लावले आम्हीआरसे
दाखवे सदृश्य रूपडे
उत्कृष्ट किंवा निरसे

खोटीस्तुती करायला
आरसे नाही माणसे
हरकून जा अकारण
दिसता टपोरीकणसे

येताजाता कळेसर्वां
आहो रे आपण कसे
प्रतिमे नाही फेरफार
दाखवती आहो जसे

व्यवस्थीत मेक अप
नको होणे उगा हसे
भुललिया बाह्य रंगा
जगत् हे समस्त फसे

पेहरावां अति महत्व
मनावर उमटवा ठसे
जिथल्या वस्तू तिथे
काहीनको आदमासे

जीममध्ये घाम गाळे
रोग नाहीत ते फारसे
नावे कुणी ठेवू नका
बालपणी केले बारसे

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# वाचकांचं पत्र !

## वाचनाविषयीची उदासीनता चिंताजनक !

जागतिक पुस्तक दिन नुकताच साजरा झाला. यनिमित्ताने अवांतर वाचनाविषयी हल्लीच्या पिढीमध्ये वाढत चाललेली उदासीनता याविषयी साधक बाधक चर्चा करण्यात आली. अवांतर वाचनाची सवय विद्यार्थी दशेत लावून घेणे गरजेचे आहे. अवांतर वाचनाने ज्ञान वाढते. हे ज्ञान पुढे व्यवहारिक जगात कुठेनाकुठे उपयोगी पडते. सध्याच्या पिढीमध्ये ज्ञानर्जनाची माध्यमे बदलली आहेत. वाढते डिजिटलायजेशन आणि अल्प दारात उपलब्ध होणारी इंटरनेटची सुविधा यांमुळे आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आले आहेत. या स्मार्ट फोनवर व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर(द), युट्युब नावाच्या कथित ऑनलाईन युनिव्हर्सिटीज निर्माण झाल्या आहेत. या ज्ञानमाध्यमांकडून हल्लीच्या पिढीची ज्ञानाची भूक चांगलीच भागवली जाते. त्यामुळे त्यापलीकडे जाऊन एखादे पुस्तक चाळावे किंवा कादंबरी अथवा ग्रंथ यांचे वाचन करावे आणि ज्ञानात भर घालावी अशी इच्छा बाळगणारे हल्ली औषधालाच सापडतील.

हल्लीच्या पिढीमध्ये तर वाचनाचा सुद्धा कमालीचा कंटाळा दिसून येतो. अशी मंडळी युट्युबच्या माध्यमावरून ज्ञानार्जन करतात. मोठमोठ्या कादंबऱ्या, कथा, ग्रंथ यांसारखे साहित्य ध्वनिमाध्यमातून ऐकवणारे अँप्सही हल्ली स्मार्ट फोन्समधील प्ले स्टोर्समध्ये मिळू लागले आहेत. आजच्या तरुणांची वाचनाप्रतीची उदासीनता लक्षात घेता नवोदित लेखक आपल्या लिखाणाचे पुस्तक छापून ते प्रकाशित करण्याचे धाडस करताना हजारदा विचार करतात. पुस्तके वाचण्याच्या लोकांच्या उदासीनतेमुळे हल्ली मोठमोठ्या लेखकांची पुस्तकेही ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्ध्या किमतीत मिळू लागली आहेत. पुस्तकांची दुकाने ओस पडल्याने अनेक पुस्तक विक्रेत्यांनी आपल्या दुकानांत जोडधंदा सुरु केला आहे. ग्रंथालये, वाचनालये यामध्ये लोकांची रेलचेल कमी झाल्याने दर्दी वाचकांना वाचनासाठी हवी असलेली शांतता आता नैसर्गिकरित्या मिळू लागली आहे. देशभरात सर्वाधिक ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत. सरकारकडून मिळणाऱ्या निधीमधील अनियमितता आणि वाचकांचा अल्प प्रतिसाद यामुळे अनेक ग्रंथालयांना आज अखेरची घरघर लागली आहे. ही सारी लक्षणे म्हणजे धोक्याची घंटा असून भावी पिढीच्या मानसिक आणि बौद्धिक विकासासाठी त्यांच्यामध्ये अवांतर वाचनाची आवड रुजवणे अत्यंत गरजेचे झाले आहे आणि त्यासाठी शाळा महाविद्यालयांतून प्रयत्न होणे आवश्यक आहे. शालेय जीवनापासून नियमित अभ्यासक्रमासह मुलांची बौद्धिक भूक वाढवण्यासाठी प्रयत्न केले जायला हवेत. ही भूक भागवण्यासाठी त्यांच्यात वाचनाविषयी रुची निर्माण करायला हवी !

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# चार गावांनी केला लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.२६, हदगांव (नांदेड) :** जिल्ह्यातील चार गावांनी केला लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार चोरंबा येथील ग्रुप ग्रामपंचायत देशमुखवाडी, सायळवाडी ,सायळवाडी तांडा व खंडेश्वर या चार गावांनी लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे बहिष्कार टाकण्याची मूळ कारण देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष झाले असताना सुद्धा या गावाला आतापर्यंत डांबरीकरण रस्ता झालेला नसल्याने संतापाने गावकऱ्यांनी एकत्र येऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

जानेवारी महिन्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना बहिष्कार टाकणार आहोत असे निवेदन दिले असताना सुद्धा कुठलाही प्रशासकीय अधिकारी बहिष्कार का टाकत आहात याची विचारपूस करायला सुद्धा आला नसल्याने संतापाने गावकरी या विषयावर ठाम राहून मतदानाची वेळ संपली असतानी सुद्धा एकही मतदान न केल्याने तहसीलदार साहेब यांनी भेट दिली असताना मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केल्याने पण गावकरी आपल्या विचारावर ठाम राहिल्याने लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार कायम राहिला आहे व बहिष्कार टाकून सुद्धा आम्हाला रस्ता व सोईसुविधा मिळाला नाही तर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सर्व गावकऱ्यांच्या वतीने धरणे आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा गावकऱ्यांनी दिला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# श्रीकांत शिंदे यांचे डोंबिवलीतील मनसे पदाधिकाऱ्यांनी केले जंगी स्वागत



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२६, डोंबिवली :** महायुतीला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पाठिंबा दाखवल्यानंतर, श्रीकांत शिंदे याना निवडून आणण्यासाठी

मनसे पदाधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे. आज डोंबिवलीमध्ये मनसे माजी नगरसेवक व पदधिकारी तसेच भाजपच्या माजी नगरसेवकांच्या आज श्रीकांत शिंदे यांनी भेटी घेतल्या. डोंबिवलीतील मनसेचे कट्टर समर्थक सुभाष पाटील यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांच्या समवेत श्रीकांत शिंदे यांचं जोरदार स्वागत केले. त्यावेळी श्रीकांत शिंदे यांनी सर्व पक्ष्यांनी मिळून मोदीन पुन्हा पंतप्रधान म्हणून निवडून आणण्यासाठी मिळून प्रयत्न करू असे सांगण्यात आले.

# आशिष बंडगर प्रज्ञा शोध परीक्षेत राज्यात दुसरा



**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.२६, खामसवाडी (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील खामसवाडी शाळेतील विद्यार्थी राज्य आणि केंद्रात झळकले आहेत.

या मध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थी अशिष शिवाजी बंडगर राज्यात दुसरा आला आहे व इयत्ता दुसरी मधील विद्यार्थीनी अक्षता नितीन बाबर हिचा केंद्रात प्रथम क्रमांक, इयत्ता दुसरी ची आकांक्षा काकासाहेब बाबर हिचा केंद्रात पाचवा क्रमांक आला आहे. तर इयत्ता तिसरी मधील विद्यार्थीनी रुधीरा गोपाळ शेळके हिचा केंद्रात तेरावा क्रमांक आला.तसेच इयत्ता चौथीमधील विद्यार्थीनी स्वराली भागवत शेळके हिचा केंद्रात दुसरा क्रमांक, आरव अमोल शेळके केंद्रात तिसरा क्रमांक, अम्रता अमोल रोहिले केंद्रात सहावा आणि प्रिया दिनेश शेळके हिचा केंद्रात अकरावा क्रमांक आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन होत आहे.

# मनपा शाळेचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळले पाहिजेत - उपायुक्त चंदा जाधव

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२६, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महापालिका प्रशासनाकडून मोफत शिक्षणा बरोबरच सत्तावीस वस्तू मोफत पुरवल्या जातात. अतिशय अनुभवी व हुशार शिक्षक व मार्गदर्शक असलेल्या महानगरपालिका शाळेत विविध खेळाचे प्रशिक्षण देण्यात येते.आपल्याला मिळत असणाऱ्या उत्कृष्ट व दर्जेदार क्रीडा शिक्षणाचा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात उत्तम प्रकारे अंगीकार करून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारावी अशी अपेक्षा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण उपायुक्त चंदा जाधव यांनी केली.त्या काल भायखळा येथील पेंग्विन हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना महापौर क्रीडा शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या.पुढे बोलताना त्या म्हणाल्या की शारीरिक शिक्षण शिक्षकांनी खेळाडूंना एक व्हिजन देऊन त्यांच्याकडून त्या दिशेने तयारी करून घ्यावी.ही तयारी करून घेताना विद्यार्थ्यांना जी काही मदत लागेल ती मदत महापालिका प्रशासन करण्यास तयार आहे. कारण विद्यार्थी सक्षम झाला तरच राज्य व राष्ट्र सक्षम होईल. यावेळी चंदा जाधव यांनी महापालिका शाळेतील सर्व विजयी खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षक तसेच शारीरिक शिक्षण विभागाचे कौतुक व अभिनंदन केले.

या कार्यक्रमाला के जे सोमय्या कॉलेज चे क्रीडा संचालक डॉ.प्रा.रविंद्र सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. प्रा रविंद्र सिंग यांनी आपल्या भाषणात सांगितले की आपण स्वतः बोराबाजार या महापालिका शाळेत शिक्षण घेतले असून त्याचा मला गर्व आहे. लोकांचा महापालिका शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन जरी वाईट असला तरी मी मात्र आज जो कोणी आहे तो केवळ महापालिका शाळेमुळेच आहे. हे सांगताना त्यांनी शालेय जीवनात आपल्या क्रीडा स्पर्धेत कधी सुरुवात केली आणिराज्य व राष्ट्रीय पातळीवर अनेक मेडल्स व पुरस्कार मिळवले.अनेक पदव्या मिळवल्या.ते येणाऱ्या काही दिवसात न्यूझीलंड येथे स्पोर्ट्स कौन्सिल साठी जात आहे.प्रा.रविंद्र सिंग यांनी मनपाच्या अनेक विद्यार्थ्यांना अथलेटिक्स चे मोफत प्रशिक्षण दिले असून प्रशिक्षण दिलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी बजावली आहे. प्रा सिंग यांची अथलेटिक्स कमिटीचा उपसंचालक म्हणून नुकतीच निवड झाली असून या पदाचा वापर आपण मनपाच्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी करू असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे यांनी केले.आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये राजेश गाडगे यांनी शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या मेहनतीमुळेच एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहचले आहेत.शारीरिक शिक्षण शिक्षकांनी आणखी मेहनत घ्यावी आणि आपल्या मनपा प्रशासनाचे नाव मोठं करावं.

तत्पूर्वी मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले.राज्य व राष्ट्रीय स्तरावर यशस्वी कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांक ₹ आठ हजार,द्वितीय क्रमांक सहा हजार आणि तृतीय क्रमांक तीन हजार रुपये,ट्रॉफी,प्रमाणपत्र आणि ट्रॅकसुट देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला मध्यवर्ती उपशिक्षणाधिकारी सुजाता खरे,शहर विभागाच्या उपशिक्षणाधिकारी सीमा चतुर्वेदी, अधिक्षिका छाया साळवे,पर्यवेक्षक दत्तू लवटे, प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या सत्यशीला कांबळे, कला अकादमी चे प्राचार्य दिनकर पवार, संगीत अकादमी च्या प्राचार्या शिवांगी दामले,हस्तकला विभागाच्या प्राचार्या श्रीम तृप्ती पेडणेकर या उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कनिष्ठ पर्यवेक्षकांनी मेहनत घेतली.सूत्रसंचालन कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी यांनी केले तर बक्षिसाचे वाचन कनिष्ठ पर्यवेक्षक विश्वनाथ गढरी यांनी केले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# 'एनएमएमएस परीक्षेत' शिरवळच्या आदर्श विद्यालयाचे उज्वल यश



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२६, शिरवळ (सातारा) :** शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या आदर्श विद्यालय शिरवळ मधील विद्यार्थी ओंकार मंगेश बनसोडे व कु.प्रतिक्षा अनिल पारधी हे २ विद्यार्थी केंद्र सरकारकडून घेतल्या जाणा-या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत राष्ट्रीय शिष्यवृत्तीधारक झाले. त्यांना इयत्ता ९.वी ते १२वी पर्यंत ४ वर्ष प्रतिवर्ष रुपये १२००० प्रमाणे ४८००० रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातील ४९.विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी ३०.विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र झाले आहेत.तर याच परीक्षेअंतर्गत १७ विद्यार्थी राजर्षी शाहू महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना इयत्ता ९.वी ते १२.वी पर्यंत प्रतिवर्ष ९६०० रुपये शिष्यवृत्ती सारथी संस्थेकडून दिली जाते. राजर्षी शाहू महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यामधे मंथन असलेकर,श्रेयस गायकवाड, कु.वैष्णवी भरगुडे,रिया देशमुख,दिव्या पवार,पुनम साखरे,अक्षदा तोडकरी,रिया शेलार,सृष्टी गारोळे,अनुष्का धनावडे,प्रज्ञा पाटील,रिया शिंदे,श्रावणी वीर,विराज ढोले, निखिल खोपडे,ज्ञान गोळे,श्रेयश साळुंखे आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.त्यांना विभागप्रमुख श्रीमती के.के. दौंडकर,डी.एस.सुतार, केदारे एम.बी. श्री.ए.एन.हेरुर,एस.व्ही.जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संतोष वाडेकर मंगळवारी राजकीय भूमिका स्पष्ट करणार






**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहमदनगर :** शेतकरी व कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना भूमिपुत्र शेतकरी संघटना या संघटनेच्या माध्यमातून अनेक प्रश्न व समस्या सर्वसामान्य जनतेच्या आजपर्यंत मार्गी लागल्या आहेत. संघटनेची राजकीय भूमिका स्पष्ट करण्यासाठी मंगळवार दि. ३० एप्रिल रोजी अहमदनगर या ठिकाणी जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली. राज्यात ठीक ठिकाणी व अहमदनगर जिल्ह्यात भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मोठी ताकद आहे. आंदोलनात्मक भूमिकेच्या माध्यमातून नेहमीच सकारात्मक लढाई लढणारी संघटना म्हणून भूमिपुत्र शेतकरी संघटनेला संपूर्ण राज्यात ओळखले जाते. सध्या देशात लोकसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत.

शिर्डी लोकसभा मतदार संघामध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून भाऊसाहेब वाकचौरे विरुद्ध शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून सदाशिव लोखंडे तसेच नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टीचे डॉ. सुजय विखे विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे निलेश लंके लोकसभेच्या रिंगणात एकमेकांसमोर उभे आहेत.

या निवडणुकीत कोणासोबत जायचे कोणाला पाठिंबा द्यायचा कोण सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणार या संदर्भात चर्चा विनिमय करण्यासाठी आणि आपली राजकीय भूमिका स्पष्ट करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा बैठकीचे आयोजन अहमदनगर या ठिकाणी करण्यात आले आहे.

या बैठकीमध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विचारविनिमय करून व त्यांच्या मताशी सहमती घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली आहे.

# गोरेगाव येथील शेतकऱ्याची मुलगी झाली डॉक्टर !

## आई-वडिलांची स्वप्नपूर्ती करून शेतकऱ्याच्या मुलीने मिळवले यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील गोरेगाव येथील शेतकरी ह.भ.प. जबाजी चौरे गुरुजी यांची नात व सुरेखा, सुनील जबाजी चौरे यांची मुलगी कु. गौरी हिने गावातील पहिली महिला होमिओपॅथी डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे.

अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले यांच्या शुभहस्ते झालेल्या भव्य दिव्य समारंभात पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. दिलीप पवार, प्राचार्य डॉ. सुनील पवार, डॉ. रफि अहमद चौधरी, डॉ. साजिद सय्यद, शिक्षक व कर्मचारी प्रमुख उपस्थितीत होते.

तिच्या या यशाबद्दल परिसरातुन कौतुक होत असुन, सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी डॉक्टर झालेचा अभिमान तिच्या कुटुंबीयांना झाला आहे. गौरीची घरची परिस्थिती जेमतेम आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिच्या पंखाला बळ दिले. काही दिवस तिच्या शिक्षणासाठी गाव सोडून नगर येथे खाणावळ (मेस) चालून तिच्या शिक्षणाचा खर्च भागवला. गौरीनेही तिचे कॉलेज आणि तिचा अभ्यास सांभाळून आईला मेस मध्ये मदत केली. गौरीचे दहावीपर्यंतचे शिक्षण गोरेश्वर माध्यमिक विद्यालय गोरेगाव येथे झाले. लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले असल्यामुळे ११ वी पासून नगर येथे पुढील शिक्षणासाठी स्थायिक झाले. ११ वी, १२ वीचे कॉलेज करत करत घरात मेस ला मदत करुन रात्री जागून निटचा अभ्यास केला. परिस्थिती सर्वसाधारण असल्यामुळे क्लास लावू शकले नाही. तरीही स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर कष्ट करून डॉक्टरकिला नंबर लागला.

गौरीचा बीएचएमएस ला अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला नंबर लागला. होमिओपॅथिक औषधांचे साईड इफेक्ट नाहीत व आजार मुळापासून नष्ट होतो म्हणून त्या फिल्डमध्ये करीअर करायचे होते असे तिने सांगितले.

तेथे साडेचार वर्षे कॉलेज केले व १८ महिणे इंटरशिप करून शेवटी दिनांक २१ एप्रिल २०२४ रोजी गौरीला पदवी प्रदान करण्यात आली. जिल्हा परिषदेचे बांधकाम व कृषी समिति सभापती काशिनाथ दाते, खा. सुजय विखे यांनीही गौरीने मिळवलेले याच्याबद्दल तिचे अभिनंदन केले आहे.

> मी डॉक्टर व्हावे ही माझ्या आईचे स्वप्न होते. ते पूर्ण व्हावी यासाठी मी मेहनत घेतली. मला डॉक्टर झाल्याची पदवी मिळताना सर्वात जास्त आनंद माझ्या आई-वडिलांना झाला. मी ग्रामीण भागातील मुलींना हेच सांगू इच्छिते मेहनत करा यश मिळते. मला लहानपणापासून समाजसेवेची आवड आहे.
>
> **- डॉ. गौरी चौरे (बी.एच.एम.एस)**

# विविध उपक्रमांतून नवी मुंबईत मतदानविषयक व्यापक जनजागृती



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** प्रत्येक नागरिकाने लोकसभा निवडणूकीत आपला मतदानाचा हक्क बजावावा यादृष्टीने स्वीप उपक्रमा अंतर्गत मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यात येत असून त्याकरिता विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये ज्या ठिकाणी लोक जास्त संख्येने एकत्र येतात अशा समारंभ, उत्सव या कार्यक्रमांच्या ठिकाणी जाऊन मतदान करण्याचे महत्व पटवून दिले जात आहे तसेच मतदान शपथ घेऊन मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

समाजातील विविध घटकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न करण्यात येत असून कोपरखैरणे येथील स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यालयात परिसर सखी विकास संस्थेच्या वतीने आयोजित कचरा वेचक महिलांच्या विशेष कार्यक्रमाप्रसंगी १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघाच्या सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपच्या नोडल अधिकारी तथा नमुंमपा क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे व सहा. नोडल अधिकारी विभा सिंग यांनी आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांसमवेत कचरा वेचक महिलांचे मतदान करण्याविषयी प्रबोधन केले. याप्रसंगी उपस्थित महिलांनी आपण स्वत: तर मतदान करुच आणि इतरांनाही मतदान करण्यास सांगू अशी सामूहिक शपथ ग्रहण केली.

अशाच प्रकारे वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित ऐरोलीच्या डी ए व्ही स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी स्वीप जनजागृती अंतर्गत शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या समोर मतदानाचा हक्क बजावण्याविषयी आवाहन करण्यात आले. उपस्थितांमधील मतदारांनी सामुहिकरित्या बोट उंचावून आपण मतदान करणार असल्याची ग्वाही दिली.

पटनी रोड येथील वेस्ट साइड व क्रोमा या मोठ्या व्यावसायिक दुकानांमध्येही मतदान विषयक जनजागृती करण्यात आली. अशा स्वरूपाच्या सर्व मोठया आस्थापनांना व संस्था कार्यालयांना भेटी देऊन मतदानाचे आवाहन केले जात आहे.

ऐरोली येथील मध्यवर्ती पोस्ट ऑफिस मध्येही जाऊन तेथील अधिकारी, कर्मचारी व पोस्टमन यांचे मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी प्रबोधन करण्यात आले. तसेच ऐरोली गावातील उत्सवा प्रसंगीही मतदानाचे आवाहन करण्यात आले.

दिघा विभाग कार्यालयाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांनीही आपल्या कर्मचाऱ्यांसमवेत मतदान करण्याची शपथ घेत जास्तीत जास्त नागरिकां पर्यंत लोकसभा निवडणूकीत मतदान करण्या विषयीचे आवाहन पोहोचविण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपले योगदान द्यावे असे सूचित केले.

दि.२० मे रोजी २५ ठाणे लोकसभा मतदार संघाची निवडणुक होत असून यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या सबलीकरणाला हातभार लावावा यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावर व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यापूर्वीच आढावा बैठकीत दिले असून त्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावरूनही मतदार जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.

# जनजागृतीपर पथनाट्य सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी दिला मतदानाचा संदेश

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** नाटक हे संदेश प्रसारित करण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम असून पथनाट्याद्वारे मनोरंजनातून प्रबोधन करण्याची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. समाज जागृतीचा संदेश हसत खेळत, दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत लोकांपर्यंत पोहचवणारी पथनाट्ये नेहमीच जनजागृतीचे लोकप्रिय माध्यम राहिलेली आहेत.

याचाच उपयोग मतदान विषयक जनजागृती करण्याकरिता करण्यात येत असून लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई क्षेत्रातील विविध शाळांमध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मतदानाबाबत जागरूकता वाढविणारी पथनाट्ये बसविली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांप्रमाणेच अनेक खाजगी शाळांमधूनही शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्र येत नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन करणारी पथनाट्ये आपापल्या शाळा परिसरात सादर केली. विशेष म्हणजे ही पथनाट्ये शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळूनच लिहिलेली होती व शिक्षकांनी पथनाट्य स्वरुपात बसवून घेतली होती.

ही पथनाट्ये शाळेच्या परिसरात सादर होत असताना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभल्याचे चित्र पहायला मिळाले. या पथनाट्यांच्या माध्यमातून भारतीय संविधान, लोकशाहीच्या सबलीकरणात मतदानाचे महत्व, संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार, कर्तव्य म्हणून मतदान करण्याची नागरिकांची जबाबदारी अशा आशयास अनुसरुन मतदान करण्याचे संदेश प्रसारण पथनाट्यांतून करण्यात आले.

२५ ठाणे लोकसभा निवडणूक २० मे रोजी होणार असून मतदानाची टक्केवारी वाढावी यादृष्टीने मतदार जनजागृतीकरिता नवी मुंबई महापलिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण विभागानेही या कामी पुढाकार घेतला असून स्वीप कार्यक्रमांतर्गत १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या सूचनांनुसार रांगोळी, चित्रकला, प्रभातफेऱ्या, निबंध, पोस्टकार्ड लेखन असे अभिनव उपक्रम शाळांतून राबविलेले आहेत.



शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे, शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे व कल्पना गोसावी यांच्या नियंत्रणाखाली केंद्र समन्वयक यांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी शाळांनाही मतदान विषयक जनजागृतीपर स्वीप कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यात आले. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमार्फत पालकांकडे मतदान करण्याचा संदेश प्रभावी रितीने पोहचविला जात आहे. शाळांनी आपापल्या क्षेत्रात सादर केलेली पथनाट्ये ही मतदान विषयक जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरली.

# देगलूर- बिलोली मतदार संघ अंदाजे ५९.७६ टक्के मतदान

**अक्षराज : अब्दुल मुबिन**

**दि.२६, देगलूर (नांदेड) :** आज झालेल्या निवडणुकीत बऱ्याच मतदातानी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.लोकशाहिला बळकट करण्याचे काम नागरिकांनी पार पाडले आहेत.

१६-नांदेड लोकसभेतील देगलूर - बिलोली मतदार संघात अंदाजे ५९.७६ टक्के मतदान झाले आहे.यामध्ये थोडा बहुत बदल होऊ शकतो. प्रत्यक्ष मतदान केंद्र साहित्य प्राप्त झाल्यानंतर अचूक मतदान टक्केवारी कळेल. निवडणूक विभाग देगलूर

# शिक्षक आहेर यांनी मतदानाचे व शांततेचे केले आवाहन

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.२६, मोखाडा :** महसूल प्रशासनाचे वतीने प्राथमिक शिक्षक नितीन आहेर यांनी हनुमान मंदिर मोखाडा येथे भाविक भक्तांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.तसेच कायदा व सुव्यवस्थेचे भान राखत शांततेच्या वातावरणात मतदान प्रक्रियेस सामोरे जाण्याचा आवाहन सुद्धा नितीन आहेर यांनी केले.

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ वाडा यांचे वतीने आयोजित हनुमान जन्मोत्सवाचे कार्यक्रमात शिक्षक नितीन आहेर यांनी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अशा घोषणांचा गजर करत येत्या २० मे रोजी लोकसभेसाठी मतदान करण्याचे आवाहन उपस्थित भाविकांना केले.जिल्हाधिकारी गोविंद बोडके,अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे यांचे मार्गदर्शनाखाली व तहसीलदार मयूर खेंगले सि ओ जव्हार तांबे यांचे सल्लयानुसार प्राथमिक शिक्षक नितीन आहेर यांनी मतदान जनजागृती केली. जन्मोत्सवात अभिषेक,श्रीराम व श्री हनुमान कथा,संकीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम व भंडारा अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन आंतरराष्ट्रीय कृष्ण



भावना मृत संघातर्फे हनुमान जन्मोत्सवा निमित्त करण्यात आले होते.साधारणपणे ५०० ते ७००चा जनसमुदाय या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होता. ग्रामीण भागात मतदानाचा टक्का वाढावा लोकशाहीचे समृद्धीकरण करण्यास हातभार लागावा म्हणून महसूल प्रशासनाच्या वतीने नितीन आहेर यांनी ही जागृती केली. तसेच पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व मोखाडा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रदीप गीते यांच्या सल्लयानुसार मतदान प्रक्रिये दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचे भान राखत ग्रामस्थांनी शांततेत मतदान प्रक्रियेला सामोरे जाण्याचे आवाहन देखील नितीन आहेर केले आहे.दोन दिवसाच्या या कार्यक्रमात पांडुरंग आनंद,आनंद प्रेम प्रभुंचे मार्गदर्शन उत्सवाचे औचित्य साधत करण्यात आले.

# जनतेच्या करातील १५ लाख रुपये निधीची बचत

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२६, नाशिक :** जिल्हा परिषदेच्या सेसनिधीतून सामान्य प्रशासन विभागाने १.३० कोटी रुपयांच्या निधीतून १५८ संगणकांची प्रिंटर व यूपीएससह खरेदी केली आहे.

जिल्हा परिषदेने यापूर्वी २०२२ मध्ये राबवलेल्या टेंडर प्रक्रियेतील अनियमितता 'माध्यमाने' उघडकीस आणल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांनी ती वादग्रस्त ठरलेली खरेदी प्रक्रिया रद्द केली होती. त्यानंतर २०२३-२४ यावर्षात १.३० लाख रुपयांच्या सेस निधीतून १५८ संगणकांची यूपीएस व प्रिंटरसह खरेदी केली असून एका संचासाठी ८२ हजार दर दिले आहेत. यामुळे जिल्हा परिषदेची पंधरा लाख रुपयांची बचत झाली आहे. या संगणक खरेदीतील अनियमितता माध्यमांनी उघडकीस आणून टेंडर रद्द होईपर्यंत पाठपुरावा केल्याने जनतेच्या करातील १५ लाख रुपये निधीची बचत झाली आहे.नाशिक जिल्हा परिषदेने फाईल ट्रॅकिंग प्रणाली सुरू केली आहे.




यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना अद्ययावत संगणक असावेत, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने २०२२-२३ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात संगणक खरेदीसाठी ९९ लाख रुपयांची तरतूद केली होती.

त्यापैकी ९२ लाख रुपयांच्या निधीतून जीईएम पोर्टलवरून खरेदी प्रक्रिया राबवण्यात आली. त्यात एक संगणकासह यूपीएस व प्रिंटर असा एक संच, याप्रमाणे १०० संच पुरवण्यासाठी नऊ संस्थांनी प्रतिसाद दिला. त्यात सर्वात कमी दर दिलेल्या पुरवठादाराने एक संच ९२ हजार रुपयांना देण्याची तयारी दर्शवली. त्यात संगणकाची किंमत ६७ हजार रुपये व यूपीएस-प्रिंटर मिळून २५ हजार असा ९२ हजार रुपये दर दिला होता. त्यानुसार कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते. मात्र, ही सर्व खरेदी करताना उद्योग ऊर्जा विभागाच्या १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याची बाब माध्यमांनी उघडकीस आणली. तसेच प्रत्येक संचासाठी बाजारभावापेक्षा १२ हजार रुपये अधिक मोजल्याचे लक्षात आणून दिले. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल यांनी ही खरेदी रद्द केली.जिल्हा परिषदेला २० जादा संगणक

जिल्हा परिषदेच्या प्रशासक काळात २०२३-२४ या आर्थिक वर्षात संगणक खरेदीसाठी अंदाजपत्रकात १.३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. आधीच्या वर्षाची संगणक प्रक्रिया वादात असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने सर्व नियमांचे व शासन निर्णयांचे पालन करून खरेदी प्रक्रिया राबवल्याने संगणकासह प्रिंटर व यूपीएस हा संच प्रत्येकी ८२ हजार रुपयांना खरेदी करण्यात आला यामुळे जिल्हा परिदेला १५८ संगणक मिळाले आहेत. यामुळे आधीच्या वादग्रस्त ठरलेल्या संगणक खरेदीच्या तुलनेत प्रत्येकी दहा हजार रुपयांप्रमाणे १५ लाख ८० हजार रुपये वाचले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेला जवळपास २० जागा संगणक मिळाले आहेत. या संगणकांचा नुकसाच जिल्हा परिषदेला पुरवठा करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाने प्राप्त झालेल्या संगणकांपैकी प्रत्येकी पंचायत समितीला पाच याप्रमाणे १५ पंचायत समित्यांना ७५ संगणक व प्रिंटर दिले आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील १७ विभागांना मिळून ८३ संगणक संच दिले आहेत.

# चंद्रहार पाटीलविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल

**दि.२६, सांगली :** महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्याविरुद्ध निवडणूक आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. विनापरवाना प्रचार पदयात्रा केल्या प्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या निवडणुकीतील हा पहिलाच आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा आहे. उबाठा शिवसेनेचे उमेदवार पाटील यांनी आपल्या निवडणूक प्रचारासाठी मिरज तालुक्यातील खटाव, बेडग या गावी लोकांच्या भेटी घेण्यासाठी पदयात्रा काढली.

मात्र, या पदयात्रेसाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांची कोणतीही परवानगी घेतली नव्हती. यामुळे निवडणूक आचारसंहिता भंग झाल्याची तक्रार भरारी पथकातील प्रमुख सुरेश चव्हाण यांनी मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. दरम्यान, निवडणूक प्रचार करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या दुचाकीच्या इंधनाचे पैसे न दिल्याच्या कारणावरून इम्तियाज ईकबाल पठाण यांने काँग्रेस भवनसमोर बसलेल्या अशोक माळी यांना शिवीगाळ करून धमकी दिल्याची तक्रार सांगली शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

# लोकसंख्या नियंत्रण हा प्रचाराचा मुद्दा का नाही ?

मुंबईत नोकरीनिमित्त प्रतिदिन लोकल रेल्वेचा प्रवास करावा लागतो. काही वर्षांपूर्वी एप्रिल मे महिना आला कि लोकल गाड्यांची गर्दी बरीचशी कमी झालेली असे, कारण मुंबईतला चाकरमानी आंबे-फणस खाण्यासाठी कोकणात आपल्या गावी गेलेला असे. आज मात्र स्थिती बदलली आहे. सुट्यांचे दिवस मग ते विद्यार्थ्यांचे असोत वा सरकारी कर्मचाऱ्यांचे मुंबईच्या लोकल गाड्या या दिवसांतही ओसंडून वाहत असतात. सकाळी कार्यालयांत जाण्याच्या आणि सायंकाळी कार्यालये सुटण्याच्या वेळेत लोकल गाड्यांच्या क्षमतेपेक्षा किमान ५ पटीने अधिक माणसे गाड्यांच्या डब्यांत अक्षरशः गुरांसारखी कोंडून प्रवास करत असतात. याखेरीज लोकल डब्यांच्या दुतर्फा दरवाजावर लटकणारी मंडळी मैलोंमैलांचा रेल्वे प्रवास अक्षरशः पायांच्या बोटांवर उभे राहून करतात. या लटकण्याच्या सर्कशीत धावत्या रेल्वेतून पडून प्रतिदिन किती बळी जातात आणि किती आयुष्यभरासाठी जायबंदी होतात याची तर मोजदादच नाही. गर्मीच्या उकाड्यात तर गर्दीत कोंडल्यामुळेही कित्येकांचा जीवसुद्धा जातो. आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी हा जीवनमरणाचा प्रवास इथला नोकरदारवर्ग नित्यनेमाने करत असतो. यामध्ये नोकरदार स्त्रियांचे होणारे हाल तर डोळ्यांना पाहवतही नाहीत. नोकरी-व्यवसायाच्या आशेने प्रतिदिन हजारोंचे लोंढे मुंबईत येत असतात. राज्यातील प्रगत आणि प्रगतशील सर्वच शहरांची आज हीच स्थिती आहे. लोकल रेल्वेचा जीवघेणा प्रवास नको म्हणून काहीजण कर्ज काढून वाहने घेतात; मात्र वाढत्या वाहनांमुळे कार्यालयीन वेळेत प्रमुख रस्त्यांवर सामान्य मुंबईकरांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. दिवसागणिक वाहनसंख्येत वाढच होत असल्याने ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषण सुद्धा कमालीचे वाढत आहे ज्याचा परिणाम हवेच्या गुणवत्तेवर होऊन गेल्या काही महिन्यांपासून मुंबई आणि मुंबईच्या आजूबाजूच्या शहरांची हवा विषारी झाली आहे. याचे परिणाम म्हणून लहान मुलांसह वयोवृद्ध, गर्भवती स्त्रिया श्वसनविकारांनी ग्रस्त झाले आहेत. या सर्व परिस्थितीला कारणीभूत एकच घटक आहे, तो म्हणजे 'लोकसंख्यवाढीचा भस्मासुर'. वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो आणि रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातील तरुणवर्ग शहराकडे वळतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आज शहरांचा श्वास कोंडतो आहे. ज्या ज्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, जीवनावश्यक बाबींची सुबत्ता निर्माण होईल त्या त्या ठिकाणी भविष्यात अशीच अवस्था निर्माण होईल. लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकून आपल्या देशाने पहिला क्रमांक पटकावला आहे. आज सर्वत्र लोकसभा निवडणुकांचे वारे वाहत आहे. काही राज्यातील काही भागांत निवडणूका पार पडल्या आहेत तर काही ठिकाणी येणाऱ्या महिन्याभरात त्या होणार आहेत. सर्वच पक्ष कंबर कसून तयारीला लागले आहेत, पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले आहेत ज्यामध्ये देशातील आजच्या समस्यांचा उल्लेख करून आमचा पक्ष त्या समस्या कशा सक्षमपणे सोडवू शकतो याची हमी देण्यात आली आहे; मात्र सर्व समस्यांचे मूळ असलेल्या लोकसंख्यावाढीवर नियंत्रण आणण्याचे आश्वासन कोणत्याच पक्षाच्या जाहीरनाम्यात आज दिसून येत नाही याचे आश्चर्य वाटते.

चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या बाता करणाऱ्या आपल्या सरकारने मात्र वाढत्या लोकसंख्येचेही भांडवल बनवले. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात. या सर्वांमुळे मागील अनेक पिढ्यांपासून शहरांत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी काही ठोस उपायोजना काढण्याऐवजी राजकीय पक्ष प्रचारामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याची भाषा करत आहेत, गरिबांना घरे बांधून देण्याची, मोफत शिधा उपलब्ध करून देण्याची आश्वासने देत आहेत. लोकसंख्येवर नियंत्रण आले कि यांतील बहुतांश समस्या आपसूकच सुटणार आहेत हे राजकीय पक्षांना केव्हा कळणार ? आज लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर भविष्यात शहरी भागांत जगणेही अवघड होईल हे निश्चित !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांचे बेहाल



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, बुलडाणा :** महावितरणची 'लाईन गुल' झाल्याने मतदान कर्मचाऱ्यांना चक्क मोबाईल टॉर्चच्या अपुऱ्या प्रकाशात मतदानाची पूर्व तयारी करावी लागली. यामुळे त्यांच्या आराम व झोपेचे ही खोबरे झाले! ही संतापजनक घटना जिल्ह्याच्या सीमावर्ती वा दुर्गम भागात झाली असेही नाही,तर ती चक्क प्रशासन व महावितरणचे मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरात घडली. स्थानिय इकबाल नगर भागातील उर्दू माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील मतदान केंद्रात हा संतापजनक प्रकार घडला. या ठिकाणी १५९ ते १६३ क्रमांकाची मतदान केंद्रे आहेत. केंद्राला किमान ५ हजार मतदार जोडले आहे.

मतदान साहित्यासह सुमारे २५ कर्मचारी पोहोचले तेंव्हा वीजपुरवठा खंडित होता. त्यामुळे केंद्राध्यक्ष, २ मतदान अधिकारी, सहायक यांना मोबाईल च्या टॉर्च सुरू करून अंधुक प्रकाशात मतदानाची तयारी करावी लागली. यावर कळस म्हणजे आज सुरू असलेल्या मतदान दरम्यान देखील विजेचा लपंडाव सुरू होता. यामुळे अपुऱ्या प्रकाशात व उकाड्यात कर्मचाऱ्यांना काम करावे लागले.तसेच मतदारांची देखील असुविधा झाली. यासंदर्भात तक्रारी करूनही वीज वितरण चे कर्मचारी आले नसल्याचा आरोप होत आहे.